cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१६५ | शनिवार, दि.११ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सणासुदिच्या दिवसात सोन्याने 'भाव' खाल्ला!

सर्वसामान्य माणसाला भूगर्भातील भूकंपाचा आता चांगलाच सराव झाला आहे. परंतु चकाकते ते सोन्याचे हादरे आता सोसेनासे झाले आहेत. सोने बाजारात सोने दररोज नवे उच्चांक प्रस्थापित करत आहे. आपणच भावाचा उच्चांक स्थापित करायचा आणि आपणच मोडायचा असा सोन्याचा खेळ सुरू आहे. सोन्याचा खेळ होतो परंतु सर्वसामान्यांचा जीव जातो अशी स्थिती आहे. तोळा तर दूरच पण एखादा मासा गुंजभर घेण्यासही त्याच्यासाठी महाग आहे. एकेकाळी देशात सोन्याचा धूर निघत असे म्हणे आज त्याचा वाराही लागेनासा झाला आहे.

### राज्यातील ५४ नद्या प्रदूषणाच्या विळख्यात

मुंबई : राज्यातील ५४ नद्या प्रदूषणाच्या विळख्यात असल्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा नद्यांच्या स्वच्छतेबाबतच्या या अहवालानुसार नीरा मध्यम प्रदूषित, कोयना, कृष्णा, वेण्णा सर्वसाधारण प्रदूषित, तर उरमोडी आणि पंचगंगा साधारण प्रदूषित नद्यांच्या यादीत आहेत. सातारा जिल्ह्यातील सर्वाधिक नद्यांचा या यादीत समावेश आहे. देशभरातील नद्यांतील प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ 'नॅशनल वॉटर क्वॉलिटी मॉनिटरिंग प्रोगाम राबवत असते. पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण किती आहे? यावर पाण्याचे प्रदूषण ठरवले जाते. यासाठी मंडळाकडून नद्यांतील पाण्याचे नमुने गोळा करत प्रयोगशाळेत त्यांची तपासणी केली जाते. त्यानंतर नद्यांचा प्रदूषित पट्टा ठरवला जातो.

# संपूर्ण कर्जमाफी, ५० हजार एकरी मदतीसाठी शेतकरी आणि शेतमजूरांचे राज्यभर आंदोलन

पुणे। प्रतिनिधी

**अतिवृष्टीग्रस्त शेतकरी, शेतमजुरांना एकरी ५० रुपये मदत, संपूर्ण कर्जमाफी यासह विविध मागण्यांसाठी शेतकरी व शेतमजूरांनी शुक्रवारी (दि.१०) राज्याच्या विविध भागात आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व अखिल भारतीय किसान सभा (महाराष्ट्र), सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (महाराष्ट्र) आणि अखिल भारतीय शेतमजूर युनियन (महाराष्ट्र) यांच्याकडून करण्यात आले. ठाणे, पालघर, सोलापूर, नांदेड, बीड, सांगली, कोल्हापूर, परभणी, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, वर्धा, अमरावती, नाशिकसह संपूर्ण राज्यातील जिल्हाधिकारी आणि तहसीलदार कार्यालयांवर मोर्चे आणि निदर्शने काढण्यात आली. तर कर्जमाफीची आणि नुकसान भरपाईची जोरदार मागणी करण्यात आली.**



शेतकऱ्यांनी कर्ज काढून बियाणे, खते, औषधे खरेदी केली होती. मात्र अतिवृष्टीमुळे पिके आणि शेती दोन्ही पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांचे सर्व काही उद्ध्वस्त झाले. अशा स्थितीत घेतलेले कर्ज फेडणे त्यांच्यासाठी अशक्य झाले आहे. तरीही राज्य सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये कर्जमाफीचा समावेश केला नसल्याने शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेले ३१ हजार ◀◀ पान २ वर

### राज्य सरकारचा 'सर्वाधिक मदत' देण्याचा दावा चुकिचा

पंजाबमध्ये सरकारने प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली असताना, महाराष्ट्रात फक्त १८ हजार ५०० रुपयांची मदत देण्यात येत आहे. त्यामुळे राज्य सरकारचा ''सर्वाधिक मदत'' देण्याचा दावा दिशाभूल करणारा असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.या सर्व बाबींचा तातडीने पुनर्विचार करून राज्य सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, शेतमजुरांना श्रमनुकसान भरपाई म्हणून ३० हजार रुपये द्यावेत, तसेच पीक नुकसानभरपाई म्हणून प्रति एकरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

## थोडक्यात...

### नागपुरात जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर'- मुख्यमंत्री

नागपूरः नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरला उभारण्यात येणारे 'कन्व्हेन्शन सेंटर' साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यावेळी स्पेनचे भारतातील राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.

### कफ सिरफ : न्यायालयाने याचिका फेटाळली

दिल्लीः मध्य प्रदेशात २२ मुलांचा बळी घेणाऱ्या कफ सिरप मृत्यूची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन आयोग किंवा तज्ज्ञ समितीद्वारे स्वतंत्र चौकशीची मागणी करणारी जनहित याचिका शुक्रवारी (१० ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयात अल्पकाळ टिकली. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने वकील-याचिकाकर्ता विशाल तिवारी यांना विचारले की, त्यांनी त्यांच्या कायदेशीर कारकिर्दीत किती वेळा जनहित याचिका दाखल केल्या आहेत. विशाल तिवारी यांनी प्रामुख्याने केंद्रीकृत चौकशीची मागणी केली होती. विशाल तिवारी म्हणाले की, मध्य प्रदेश आणि तामिळनाडू, जिथे आता बंदी घातलेली कोल्ड्रिफ सिरप उत्पादक कंपनी आहे, ते एकमेकांना दोष देत आहेत, तर राज्यांनी चौकशीत कोणतीही ठोस पावले न उचलल्याने मौल्यवान वेळ जात आहे.

### १९ ऑक्टोबर रोजी पहिले आरोग्य साहित्य संमेलन

पुणे : पहिले आरोग्य साहित्य संमेलन येत्या रविवार १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत येथे आयोजित करण्यात आले आहे. साहित्यिक डॉ. संजय ओक यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, गायक-संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या संयोजनामध्ये रुग्ण हक्क परिषद,मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष (मुंबई), अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बालगंधर्व परिवार ट्रस्ट, पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र साहित्य परिषद, ग्रँड पृथ्वी मेडिकल फाउंडेशन या संस्थांनी पुढाकार घेतला आहे. या निमित्ताने पुणे आरोग्य महोत्सवाचेही आयोजन केले आहे. आरोग्य महोत्सवामध्ये २५ हजार ते ४० हजार रुग्णांची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे.

### फडणवीसांकडून योगेश कदमांना 'क्लीन चीट'

पुणेः कुख्यात गुंड निलेश घायवळ याचा भाऊ सचिन घायवळ याला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शस्त्र परवाना मंजूर केल्याचा आरोप करत विरोधकांनी राजीनाम्याची मागणी केली होती. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडत कदम यांना 'क्लीन चीट' दिली आहे. नाशिक दौऱ्यावर असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. सचिन घायवळ याला शस्त्र परवाना देण्याच्या आरोपांवर ते म्हणाले, ''या प्रकरणी गृहराज्यमंत्र्यांनी एक सुनावणी घेतली होती. मात्र, पुणे पोलीस आयुक्तांनी वस्तुस्थिती समोर आणल्यानंतर शस्त्र परवाना देण्यात आलेला नाही. जर परवाना दिला असता, तर आरोपांना जागा होती. पण तसे झाले नाही.''

### केंद्रीय मंत्री रक्षा खडसेंच्या पेट्रोलपंपावर दरोडा

मुक्ताईनगर : केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुक्ताईनगर येथील पेट्रोल पंपावर दरोडा पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील करकी गावाजवळील पंपावर हा दरोडा पडला आहे. पंपावरील कर्मचाऱ्यांना मारहाण करत व बंदुकीचा धाक दाखवत १ लाख रुपयांची रोकड दरोडेखोरांनी पळवली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. दरम्यान दरोडेखोरांचा पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत पाच पैकी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. पाच दरोडेखोर मोटरसायकलवरून आले. यावेळी या दरोडेखोरांनी पंपावरील कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवत दहशत निर्माण केली. सुमारे एक लाख रुपयांची रोकड त्यांनी लुटली.

## शिवाजीराव दादांनी विविध क्षेत्रात भरीव काम केले-राज्यपाल बागडे



गेवराई । प्रतिनिधी

शिवाजीराव (दादा) पंडित यांनी शिक्षण आणि सहकार क्षेत्रासह विविध क्षेत्रात भरीव काम केले. मंत्री असताना रोजगार हमी योजना खाते त्यांनी यशस्वीपणे सांभाळत ग्रामीण भागाचा विकास केला. त्याचबरोबर ग्रामीण भागात शिक्षण संस्था उभारून आपल्या भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रयत्न करुन घराघरात शिक्षण पोहचविले असल्याचे गौरवोद्गार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी काढले.

गेवराई येथे शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा ◀◀ पान २ वर

## लोकांना कर्जमाफीचा नाद लागलाय निवडणुकीत आश्वासन देतच असतात

### सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी चोळले शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ

जळगाव । प्रतिनिधी

अगोदरच शेतकरी अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाने परेशान आहे त्यातच राजकीय नेते त्याच्या दुःखावर मीठ चोळण्याचे काम करत आहेत. लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे. आम्हाला निवडून यायचे आहे, तुम्हाला निवडणुकीत काहीतरी आश्वासन द्यावे लागते, असे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या विधानामुळे



शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, चोपडा येथे एका कार्यक्रमात ते बोलत होते.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रावर ◀◀ पान २ वर

#### निर्लज्जपणाचा कळस-राजु शेट्टी

बाबासाहेब पाटील यांच्यासारख्या मंत्री ज्यांच्याकडे सहकार खाते आहे ते शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद लागला असे बोलत असतील तर हा निर्लज्जपणाचा कळस आहे. मुळात शेतकरी कर्जबाजारी का झाला तर सरकारच्या धोरणामुळे झाला. तुमच्या धोरणामुळे आमचा शेतकरी कर्जबाजारी होत आहे, असे सांगावे अशी टीका शेतकरी नेते राजु शेट्टी यांनी बाबासाहेब पाटील यांच्यावर केली आहे.

#### सहकारमंत्र्याची सपशेल दिलगिरी

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे वक्तव्य बाबासाहेब पाटील यांनी केले. यावरुन वादंग निर्माण झाल्यानंतर बाबासाहेब पाटील यांनी तातडीने आपल्या वक्तव्याविषयी सपशेल दिलगिरी व्यक्त केली. माझे कर्जमाफीविषयीचे वक्तव्य दूध उत्पादनासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जाला अनुसरुन होते असे स्पष्टीकरण बाबासाहेब पाटील यांनी दिले आहे.

## विद्युत कर्मचाऱ्यांचा संप स्थगित



पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्यावतीने विविध मागण्याबरोबरच तीनही कंपन्यांचे खासगीकरणाचा शासनाने घातलेला घाट याच्या विरोधात कृती समितीच्यावतीने राज्यात ७२ तासांचा संप पुकारण्यात आला होता. मात्र व्यवस्थापनाने कृती समितीतील संघटनांना केलेल्या आवाहनाचा आदर राखून तसेच १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी कृती समितीतील संघटना बरोबर वाटाघाटीची तारीख निश्चीत केली आहे. ही बाब लक्षात घेऊन कृती समितीने संप स्थगित केला आहे, असे कृती समितीने प्रसिध्दिपत्रकाव्दारे कळविले आहे.

◀◀ पान २ वर

## मारिया कोरिना मचाडो यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहिर

नवी दिल्ली । वृतसंस्था

व्हेनेझुएलाच्या लोकांच्या लोकशाही हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि हुकूमशाहीतून लोकशाहीकडे न्याय्य आणि शांततापूर्ण परिस्थिती साध्य करण्यासाठी केलेल्या संघर्षासाठी'' मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, अशी घोषणा स्वीडिश अकादमीने शुक्रवारी (१० ऑक्टोबर) केली. ''गेल्या



वर्षात, मारिया कोरिना मचाडो यांना लपून राहण्यास भाग पाडले गेले आहे. त्यांच्या जीवाला गंभीर धोका असूनही त्या देशातच राहिल्या आहेत, या निवडीमुळे लाखो लोकांना प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी त्यांच्या देशातील विरोधकांना एकत्र आणले आहे. व्हेनेझुएलाच्या समाजाच्या लष्करीकरणाला विरोध करण्यात ती कधीही डगमगली नाही. लोकशाहीकडे शांततापूर्ण परिस्थितीसाठी मारिया कोरिना मचाडोच्या पाठिंब्यावर ठाम राहिली आहे, असे नोबेल अकादमीने म्हटले आहे.

## बीड कारागृह अधीक्षकांची पथकाकडून चौकशी सुरू

बीड । प्रतिनिधी

धर्म परिवर्तन आणि त्यासाठी पैसा यासंदर्भातील आरोप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केल्यानंतर शुक्रवारी बीड कारागृहाचे अधीक्षक पेट्रस गायकवाड यांच्या चौकशीसाठी छत्रपती संभाजीनगर येथून पाच अधिकाऱ्यांचे पथक बीडमध्ये दाखल झाले असून, रात्री उशिरापर्यंत कारागृह अधीक्षकांची चौकशी सुरू होती.

बीड जिल्हा कारागृहातील कैद्यांचे धर्म परिवर्तन करण्यासाठी त्यांना आमिष दाखवले जात आहेत. याशिवाय तुमची शिक्षा कमी करण्याची जिम्मेदारी माझी असल्याचे आमिष बीड कारागृहातील अधीक्षक पेट्रस गायकवाड हे करत असल्याचा आरोप भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केला होता. यानंतर कारागृहातील कैद्यांचे वकील यांनी ◀◀ पान २ वर

## घरकुलासाठी मोफत वाळू मिळण्याचा मार्ग मोकळा

मुंबई । प्रतिनिधी


महाराष्ट्र सरकारने गरिबांच्या घरकुल स्वप्नाला बळ देणारा मोठा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री आवास योजना आणि आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील घरकुल योजना या योजनांतील लाभार्थ्यांना १० टक्के मोफत वाळू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सरकारने अलीकडेच वाळू धोरणात मोठे बदल केले आहेत. ◀◀ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ (Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
  ➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
  ➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
  ➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
  ➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६७.०० क्विंटल | २,३६० | २,७०० | २,५०७ |
| ज्वारी/हायब्रिड : ६७.५० क्विंटल | २,००० | ३,०३१ | २,३९० |
| मका/लोकल:२३.०० क्विंटल | १,६०१ | १,६०१ | १,६०१ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ६८.५० क्विंटल | २,१०१ | २,७५१ | २,५८३ |
| मुग: ७.०० क्विंटल | २,५०० | ४,५०० | ३,४८० |
| सोयाबीन: ४४६.०० क्विंटल | २,५०१ | ४,२०० | ३,७१२ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१३१ | ५,१३१ | ५,१३१ |

## जि.प., पं.स. निवडणुकांमध्ये २०२५ च्या नियमांनुसार आरक्षण

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये २०२५ च्या नव्या नियमांनुसारच आरक्षण लागू होणार असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. यासाठी न्यायालयाने आपल्या आदेशात पुन्हा एकदा दुरुस्ती केली.**

चक्रानुक्रमे (आळीपाळीने) आरक्षण देण्याच्या १९९६ च्या नियमांआधारे निवडणुकांमध्ये आरक्षण निश्चित करावे, अशी मागणी करणाऱ्या विशेष अनुमती याचिका



सर्वोच्च न्यायालयाने २५ सप्टेंबर रोजी फेटाळल्या होत्या. तेव्हा २०२५ च्या नव्या नियमांनुसार आरक्षण दिले जाईल, असे स्पष्ट झाले. २५ सप्टेंबरच्या आदेशामध्ये न्यायालयाकडून चुकून मध्य प्रदेशातील नियमांचा उल्लेख झाला होता. त्यामुळे न्यायालयाने ही चूक ६ ऑक्टोबर रोजी दुरुस्त करत १९९६ च्या नियमांचा उल्लेख आदेशात केला. त्यामुळे राज्यातील निवडणुकांमध्ये ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सणासुदिच्या दिवसात सोन्याने 'भाव' खाल्ला!

सर्वसामान्य माणसाला भूगर्भातील भूकंपाचा आता चांगलाच सराव झाला आहे. परंतु चकाकते ते सोन्याचे हादरे आता सोसेनासे झाले आहेत. सोने बाजारात सोने दररोज नवे उच्चांक प्रस्थापित करत आहे. आपणच भावाचा उच्चांक स्थापित करायचा आणि आपणच मोडायचा असा सोन्याचा खेळ सुरू आहे. सोन्याचा खेळ होतो परंतु सर्वसामान्यांचा जीव जातो अशी स्थिती आहे. तोळा तर दूरच पण एखादा मासा गुंजभर घेण्यासही त्याच्यासाठी महाग आहे. एकेकाळी देशात सोन्याचा धूर निघत असे म्हणे आज त्याचा वाराही लागेनासा झाला आहे. सणासुदीचा काळ सुरू होताच सोने खूपच शेफारते. त्याच्यापुढे हिमालयसुद्धा ठेंगणा भासू लागतो. सोने वरचेवर शेफारत चालल्याने ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. दिवाळीत सोने खरेदी करणे म्हणजे दिवाळं काढून घेण्यासारखेच आहे. सोन्याचे भाव का वाढत चालले आहेत हे न उलगडणारे कोडे आहे. बुधवारी पुन्हा एकदा सोन्याच्या दरवाढीने उचल खाल्ली. स्थानिक बाजारात २४ कॅरेट सोन्याचा दर सव्वा लाख रुपयांच्या पुढे गेला. देशांतर्गत गुंतवणूकदारांकडून वाढती खरेदी आणि जागतिक अस्थिरतेमुळे सोन्याच्या किमतींना शेफारण्याची संधी मिळाली.

अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची शक्यता असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याची मागणी वाढली आहे. सण-उत्सवासह लग्नसराईचे वेध लागल्याने खरेदीत वाढ झाली असली तरी ग्राहकांना सोने खरेदीचे नियोजन करताना अतिरिक्त खर्चाचा विचार करावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरतेसह देशांतर्गत मागणीमुळे सोन्याच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे. बुधवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किमतीने प्रति औंस ४ हजार डॉलर्सचा टप्पा ओलांडला. इतिहासात पहिल्यांदाच सोन्याच्या किमतींनी हा टप्पा ओलांडला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात यू. एस. ट्रेझरी बाँडवरील उत्पन्न दरात घसरण झाल्यामुळेही सोन्याला आधार मिळाला आहे. गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून पैसा काढून सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यात गुंतवणूक वाढवली आहे. चांदीने सुद्धा १ लाख ५६ हजार ५६० रुपयांचा नवीन उच्चांक केला. मुंबईच्या सराफा बाजारात मंगळवारी १० ग्रॅम सोन्याचा दर १ लाख २५ हजार ५०० रुपयांवर पोहोचला. बुधवारी त्यात दीड हजार रुपयांची वाढ झाली. जीएसटी आणि घडणावळीसह १० ग्रॅम सोन्यासाठी १ लाख ४० हजार ८१० रुपये मोजावे लागले. दिवाळीत हे दर आणखी वाढणार यात शंका नाही. दररोज सराफ व्यावसायिक सर्वसाधारणपणे सुमारे ९० टन सोने खरेदी करतात. जागतिक पातळीवर सोन्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढल्याने दर वाढत आहेत. दिवाळीत सोने तोळ्याला १० हजार रुपये वाढणार असा अंदाज आहे. महिलावर्ग नाकातली नथनी आणि कानातील फुलासाठीही महाग झाला आहे. महिलावर्गाची धडपड 'थोडं थोडं का होईना पण सोनं घेऊन ठेवायचं' अशी होती. कारण कधीही ते अडचणीच्या काळी उपयोगात येतं. आजचा सोन्याचा दर पाहिल्यास, त्यांची धडपड लाख मोलाची होती हे लक्षात येते. भारतातील सोन्याच्या कर्जाचा बाजार २.९४ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. हा नवीन कल ग्रामीण आणि शहरी कर्जदारांच्या अल्प मुदतीच्या तरलतेची वाढती भूक दाखवणारा आहे. लोकांना त्यांच्या व्यवसायाच्या गरजा, अचानक आपत्कालीन परिस्थिती किंवा वैयक्तिक खर्चासाठी सोने न विकता तारण ठेवून त्वरित पैसे उभे करायचे आहेत. सोन्याचे चढे दर आणि सुलभ अल्प मुदतीच्या पतपुरवठ्याचा भारतीय फायदा घेत आहेत. यंदा सोन्याचे भाव ४७ टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहेत तसेच चांदीचे भाव ५५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहेत. म्हणजे चांदीने सोन्यालाही मागे टाकले आहे असे म्हणता येईल.

उद्योगांमध्ये चांदीची मागणी वाढणे हे चांदीची किंमत वाढण्यामागचे मुख्य कारण आहे. अनेक नवीन उत्पादनांमध्ये चांदीचा वापर केला जात आहे. त्याचबरोबर सजावटीच्या वस्तूंमध्येही चांदीला खूप मागणी आहे. जगात राजकीय धोका वाढला तर सोने आणि चांदीच्या किमती आणखी वाढू शकतात. अमेरिकेतील शटडाऊनमुळे सोन्याची चमक वाढली आहे. अमेरिकेतील शटडाऊन म्हणजे सरकार चालवण्यासाठी जो खर्च लागतो त्याची तरतूद करण्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया. अमेरिकेत जेव्हा सरकारी निधी विधेयक मंजूर होत नाही तेव्हा सरकारी कामकाज ठप्प होते, याला शटडाऊन म्हणतात. अमेरिकन जनतेला सरकारकडून मिळणाऱ्या सर्व सवलती, सबसिडी बंद ठेवण्यात येतात. त्याचा अर्थव्यवस्थेवर आणि बाजारपेठांवर खोलवर परिणाम होतो. अशा वेळी गुंतवणूकदार सुरक्षित ठिकाणी गुंतवणुकीचा पर्याय शोधतात आणि सोन्याकडे वळतात. ट्रम्प यांच्या काळात सोन्याच्या किमती १३.५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. अमेरिकेच्या तिजोरीत जगातील सर्वांत मोठा सुवर्णसाठा आहे. अमेरिकेत ठेवलेल्या सोन्याचे मूल्य सुमारे ८३ लाख कोटी आहे. अमेरिकेच्या तिजोरीत एकूण २६१.५ दशलक्ष औंस सोने आहे. भारतात गत ६ वर्षांत सोने तीन पट महागले आहे, किमतीत २०० टक्क्यांची वाढ झाली आहे.

भारतात प्रत्येक कुटुंबात सोने हा भावनिक आणि खरेदीचा मुद्दा असतो. रशिया-युक्रेन संघर्षानंतर रशियाच्या परकीय चलन साठ्याचा मोठा भाग घटला. जागतिक संघर्ष, टॅरिफ वाद, मध्यवर्ती बँका सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची करत असलेली खरेदी, चीनचे सोने साठवणूक धोरण यामुळे सोन्याचे दर वाढत आहेत असे म्हटले जाते. केवळ संपत्तीचे प्रतीक म्हणून नव्हे तर धार्मिक-सांस्कृतिक महत्त्व असल्याने भारतात सोन्याविषयीची आस आहे. देशात घरोघरी असलेले सोने लक्षात घेतले तर ते सुमारे २५ हजार टन असेल. सोने जवळ असणे सर्वसामान्य माणसाला सुरक्षित वाटते. महागाईच्या दबावामुळे चलनाची खरेदी करण्याची शक्ती घटल्यामुळे लोक सोन्यात संपत्ती सुरक्षित ठेवतात. डॉलर कमकुवत झाला की सोन्याचे भाव वाढतात. सोन्याच्या भावातील सध्याची तेजी ही ग्राहकांच्या वाढलेल्या मागणीमुळे नव्हे तर पूर्णपणे आंतरराष्ट्रीय आर्थिक बाजारावर अवलंबून आहे.

# रोटरी क्लबचा गोंदीकरांना मदतीचा हात; अन्नधान्य वाटप



**गेवराई । प्रतिनिधी**

जगाला पल्स पोलिओची लस निःशुल्क पुरविणारी समाजसेवी संस्था रोटरी इंटरनॅशनलच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यातील अतिवृष्टीनेग्रस्त गोंदी येथील पूरग्रस्तांना दैनंदिन जीवनातील अन्नधान्य, मीठ, मिरची साहित्य रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या हस्ते शनिवारी वितरित करण्यात आले . रोटरी क्लब सातत्याने विविध सामाजिक कार्य करणारी संघटना आहे . मराठवाडा व राज्यातील विविध भागात शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी रोटरी क्लबने पुढाकार घेतला आहे . याचाच एक भाग म्हणून रोटरी क्लब ऑफ उदगीर च्या सौजन्याने २०० किराणा साहित्याचे वाटप गेवराई तालुक्यातील गोदाकाठच्या गोंदी गावातील ग्रामस्थांना शनिवार दि . ४ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ ते ४ च्या वेळेत रोटरी क्लब ऑफ गेवराईचे सचिव प्रविण जैन, व्होकेशनल सर्व्हिसेस चेअरमन राजेंद्र डेंगे, क्लब लर्निंग फॅसिलिटेटर चेअरमन प्रशांत घोटणकर यांनी गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे व उदगीर रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत मांगूळकर, सचिव विक्रम हलकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार गजानन मोरे, मंडल अधिकारी जाधव , महसूल सहाय्यक कृष्णा मिसाळ, सुधीर जोशी ,गजानन वादे, शुभम गायकवाड, वाहन चालक विजय मुसळे यांच्या उपस्थितीत व हस्ते वाटप करण्यात आले . २०० किटमध्ये गव्हाचे पीठ, बेसन पीठ, तेल, साबण, मसाले, मीठ ,मेणबत्ती, बटाटे, कांदे, पाणी बॉटल, बिस्कीट, चहा पावडर ,टूथपेस्ट, हळद ,शेंगदाणे ,दाळ, साखर आदी साहित्याचा समावेश होता. पूरग्रस्तांचे अश्रु पुसण्याच्या छोटासा प्रयत्न रोटरी क्लबच्या माध्यमातून करण्यात आला . रोटरी क्लबच्या या समाजकार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे .

# १७ ऑक्टोबरचा ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा रेकॉर्ड ब्रेक होणार!

## समता परिषद आणि सकल ओबीसी संघटनांच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांचा निर्धार!

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारने मराठा समाजासाठी हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढून मराठा समाजाचे ओबीसीकरण करण्यासाठी मुभा दिली असल्याने राज्यातील ओबीसी समाजामध्ये राज्य सरकारच्या विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे. सदरील हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर महाराष्ट्र सरकारने तात्काळ रद्द करावा या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आणि सकळ ओबीसी समाज संघटनांच्यावतीने आयोजित केला असून हा महाएल्गार मेळावा रेकॉर्ड ब्रेक होणार असल्याचा निर्धार समता परिषद आणि ओबीसी समाजातील विविध संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत करण्यात आला आहे.**

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे संपन्न होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेच्या पूर्व नियोजनासाठी आज शुक्रवार रोजी बीड येथील हॉटेल नीलकमल येथे मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सत्संग मुंडे, रवीभाऊ सोनवणे, प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, प्रा. संतोष वीरकर, मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, चक्रधर उगले, परीट समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदाताई पांचाळ, वंजारी समाजाचे नेत्या मयुरीताई बांगर, मनोज घोडके, मधुकर झरेकर, बिबीशन खुणे, तानाजी फुले, नानासाहेब राऊत, दीपक वैद्य, रवींद्र खरात, माऊली शिरसाट, सुभाष लोंढे, या सभेचे आयोजक तथा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्यासह समता परिषदेचे मराठवाड्यातील जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, ओबीसी मधील विविध समाजाचे प्रमुख पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोगत व्यक्त करताना मान्यवरांनी ओबीसी समाजावर स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत असलेल्या अन्याय अत्याचाराची गाथा उपस्थितांसमोर व्यक्त केली. पुरातन काळापासून शूद्र समजल्या जाणाऱ्या ओबीसी समाजाला आजपर्यंत कुठल्याही सुविधा मिळाल्या नसल्याने या




समाजाचा उत्कर्ष कोसो दूर राहिला आहे. ओबीसीचे राष्ट्रीय नेते छगनरावजी भुजबळ यांच्या माध्यमातून ओबीसी समाजासाठी मंडल आयोगाची अंमलबजावणी काही प्रमाणात का होईना करण्यात आली. ओबीसी समाजाला मंडल आयोगाचा फायदा होत नाही तोपर्यंतच महाराष्ट्र सरकारने हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढून ओबीसी समाजावर मोठा अन्याय केला आहे. या अन्यायाच्या विरोधात ना. छगनरावजी भुजबळ साहेब विधिमंडळात आणि न्यायालयीन लढाई लढत आहेत. मात्र महाराष्ट्र सरकारला अद्यापही घाम फुटला नसल्याने आता रस्त्यावरील लढाई लढण्याची वेळ आली आहे. यासाठीच सदरील ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महाएल्गार मेळाव्याच्या माध्यमातून ओबीसी समाजाची ताकद महाराष्ट्र सरकारला दाखवून घ्यावी लागणार आहे. दडपशाहीच्या माध्यमातून राज्यात लागू करण्यात आलेल्या हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर रद्द करण्यासाठी आता ओबीसी समाजाला देखील दडपशाही सुरू करावी लागणार आहे. त्याची पहिली झलक बीड येथे आयोजित या महाएल्गार मेळाव्यातून नक्कीच दिसेल असा विश्वास या बैठकीत उपस्थित प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या बैठकीस माळी महासंघाचे प्रा. लक्ष्मण गुंजाळ, माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, मोहन आघाव, केशव तांदळे, बापू गाडेकर, रणजीत सोन्नर, दिगंबर नाईकनवरे, जगन खेत्रे, कृष्णा शिंदे, महादेव दुधाळ, धनंजय काळे, नितीन साखरे, निखिल शिंदे, नितीन राऊत, अजिंक्य सुरवसे, अविनाश उगले, मुकुंद शिनगारे, संतोष रासवे, संजीवनीताई राऊत, सुभोष मुंडे, बाळू यादव, सावता काळे, उद्धव मुळे, उद्धव मेत्रे, दीपक भुजबळ, रावसाहेब राऊत, अनिकेत जिरे यांच्यासह मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### आ.धस पुत्र जयदत्तच्या

केले त्यांचेही मी विशेष आभार मानतो यावेळी मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते भक्ती प्युअर व्हेज हे रेस्टॉरंट नक्कीच आष्टीकारांना चांगल्या प्रतीचे जेवण देण्याचे सेवा देण्याचे काम करेल. उद्घाटनाला आलेल्या बीडच्या खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना आमचे प्रतिनिधी शरद रेडेकर यांनी आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये सिव्हिल सर्जन डॉक्टर नसल्याचे सांगितले यामुळे गोरगरीब महिलांना बाळंतपणासाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये पैसे मोजावे लागतात याची दखल घेऊन येणाऱ्या पंधरा दिवसात आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयात सिविल सर्जन श्री रोग तज्ञ डॉक्टर मी देतो अशी त्यांनी ग्वाही दिली.

-----------

### कपिलधारवाडी व

तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे, तसेच महसूल, ग्रामविकास, पोलीस, पाणीपुरवठा, महावितरण, आरोग्य, भूमी अभिलेख आदी विभागांचे अधिकारी तसेच संबंधित गावांचे सरपंच, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी आणि मंडळ अधिकारी उपस्थित होते. पुनर्वसन प्रक्रियेत उद्भवणाऱ्या अडचणी, पर्यायी स्थळांची निवड आणि आवश्यक मूलभूत सुविधांची उपलब्धता यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.जिल्हा प्रशासनामार्फत पुनर्वसित नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन मा. जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

-----------

### अतिवृष्टीतील उत्कृष्ट कार्याबद्दल

श्रेय पंकजाताई मुंडे यांना जाते.तहसीलदार शेळके यांनी अतिवृष्टीच्या दिवसांत बीड शहरातील सखल भागांमध्ये स्वतः रस्त्यावर उतरून परिस्थिती नियंत्रणात ठेवली, नागरिकांना धीर दिला, अशा कार्याची प्रशंसा उपस्थितांनी केली. भाजपाच्या वतीने झालेल्या या सत्कार प्रसंगी डॉ. अभय वनवे यांनी तहसीलदार शेळके यांना शुभेच्छा देत सांगितले की,आपल्या प्रशासकीय कार्यातून सर्वसामान्यांचे भले होण्यासाठी परमेश्वर आपल्याला अधिक ऊर्जा देवो.

-----------

### पात्रुड-लऊळ रस्ता ठरतोय

करण्यात आली होती, पण काही दिवसांतच ती उखडून गेला.

रस्ता दुरुस्त न झाल्यास संतप्त नागरिक आणि शेतकरी, स्थानिक पत्रकार आंदोलनाचा इशारा देत आहेत. प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन या रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा अपघातांच्या आणि जीवितहानीच्या घटनांची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

-----------

### परळी तहसीलचा शेतकऱ्यांनी

शासन आदेशात स्पस्ट नमूद केले असून या बाबत किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.अजय बुरांडे, जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.पी.एस.घाडगे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.भगवान बडे आदी शिष्ट मंडळाने प्रशासनासोबत चर्चा केली असता किती जिरायती आणि बागायती क्षेत्र तालुक्यात दर्शविलेले आहे त्यानुसार नुकसान भरपाई मिळणार? एका नुकसानीची मदत मिळाल्यावर दुसऱ्या नुकसानीची मदत मिळणार का? असा प्रश्न केला असता प्रशासन देखील याबाबत निरुत्तर राहिले. एकूणच शेती आणि शेतकरी प्रश्नावर सरकार आणि प्रशासन असंवेदनशील असल्याचे यावेळी दिसून आले.सरकारने केलेली मदत म्हणजे केवळ आकड्याचा खेळ करून राज्यातील शेतकऱ्यांना भ्रमनिराश करण्यात आला आहे. मेटाकुटीला आलेला बळीराजाच्या सहनशीलतेचा अंत होत असून वेळीच मागण्या सोडवल्या नाहीत तर सरकारी कार्यालय ताब्यात घेऊन शासकीय कामकाज ठप्प करण्यास ही शेतकरी मागेपुढे पाहणार नाही असा सज्जड इशारा ही यावेळी किसान सभेने सरकारला दिला.

-----------

### दिवाळीपूर्वी शेतकरी

या पुराच्या पिण्यामुळे जमिनी खरडून गेल्याने शेतीच शिल्लक राहिली नाही, ही वस्तुस्थिती आहे, शेतावरील घरदार पुराने वाहून गेल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत, आज पर्यंत त्यांनी काहीच सरकारी मदत मिळाली नसल्याने हे असविधन शिल सरकार नेमक करत तरी काय आशी म्हणण्याची वेळ आली आहे, दिवाळी पुर्वी आशा शेतकर्यांना मदत न मिळाल्यास सणाची पंणती देखिल त्यांच्या घरात पेटणार नसल्याचे विदारक चित्र सध्या जाणवत आहे,सरकारी मदत दिवाळीपूर्वी न मिळाल्यास बळीराजासह त्यांच्ये चिमुकल्यांना हे सर्व कोण समजविणारा हा प्रश्न पिडीत बळीराजस सतवत आहे, त्यामुळे लवकरात लवकर विनाविलंब मदत करुन सरकारांने सिध्दत्व दाखवुन देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

-----------

### श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे

महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त प्रथमच महाराष्ट्रातील सहकार चळवळ सक्षमीकरण करण्याकरिता आपले अमूल्य व महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार वितरीत करण्याचा ठराव घेण्यात आला.त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व पतसंस्था व मल्टीस्टेट यांच्याशी समन्वय व विचारविनिमय करून प्रथम पुरस्काराचे मानकरी म्हणून आर जी कानडे यांना नामांकित करण्यात आले.सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक नामदार राधाकृष्ण विखे पाटीवर,जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य.तर प्रमुख उपस्थिती मध्ये नामदार प्रतापराव जाधव,राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य,आ. संजय गायकवाड बुलढाणा,आ.संजय कुटे,आ सिद्धार्थ खरात,आ.वसंत खंडेलवाल हे होते.आर.जी कानडे यांनी सहकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करताना संस्थात्मक विकास,पारदर्शक व्यवहार व सदस्यहित यांचा उत्तम समन्वय साधला आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे केवळ माजलगाव तालुका नव्हे तर मराठवाड्यातील सहकार चळवळ सक्षम होण्यास बहुमूल्य महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या यशस्वी कार्याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामुळे निश्चितच माजलगावचे नाव लौकिक त्यांनी वाढवले आहे.या समारंभास सहकार क्षेत्रातील मान्यवर, विविध पतसंस्था व मल्टीस्टेट,संस्थांचे अध्यक्ष उपाध्यक्ष संचालक कर्मचारी वृंद व सदस्य तसेच स्थानिक नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### संपूर्ण कर्जमाफी, ५० हजार एकरी

६२८ कोटी रुपयांचे पॅकेज हे ''महा-मदत'' म्हणून सादर केले गेले असले तरी प्रत्यक्षात त्यातील बहुतांश रक्कम ही आधीपासून अस्तित्वात असलेल्या योजनांची बेरीज असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. तर नवीन तरतूद म्हणून केवळ रब्बी हंगामासाठी ६ हजार ५०० कोटी रुपये राखीव ठेवले असून, उर्वरित रक्कम ही जुनीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संघटनांच्या म्हणण्यानुसार, पिकविमा योजनेअंतर्गत मिळणाऱ्या संभाव्य भरपाईचाही समावेश या पॅकेजमध्ये करण्यात आला आहे, ज्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः प्रीमियम भरलेला आहे. त्यामुळे या योजनेचा निधी ''मदत पॅकेज''मध्ये धरून आकडा वाढवणे ही दिशाभूल असल्याचे त्यांचे मत आहे. तसेच रोजगार हमी योजनेसाठी आधीच केंद्र व राज्य सरकारकडून निधी दिलेला असल्याने त्याच रकमेला पॅकेजचा भाग दाखवणे हे शेतकऱ्यांशी अन्यायकारक असल्याचे संघटनांनी म्हटले.राज्यात अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या जनावरांना दिली जाणारी मदत आणि उद्ध्वस्त झालेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी दिलेले सहाय्य हे देखील एनडीआरएफच्या (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी) माध्यमातून केले जाणार आहे. त्यामुळे या निधीचे श्रेय राज्य सरकारने आपल्या पॅकेजमध्ये घेतल्याचा आरोप करण्यात आला. सरकारने जाहीर केलेली नवीन मदत फक्त रब्बी हंगामासाठी प्रति हेक्टरी १० हजार रुपयांपर्यंत मर्यादित आहे. राज्यात ६८ लाख हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीग्रस्त असल्याचे सांगण्यात आले असून, या आकड्याच्या तुलनेत मदत अत्यल्प असल्याचे स्पष्ट झाले आहे.

----------

### लोकांना कर्जमाफीचा नाद लागलाय

मुसळधार पावसाचा कहर सुरू असून अनेक भागांमध्ये ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, या मागण्या जोर धरत आहेत. एकीकडे विरोधकांकडून सरकारवर टीका सुरू आहे, तर दुसरीकडे शेतकरीही निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आठवत सरकारला जाब विचारत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा केली जात असली तरी, त्याचवेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लोकांनी ठरवले पाहिजे आपल्याला काय मागायचेय. एखाद्या गावात निवडणुकीच्या काळात अनिल भाईदाससारखा माणूस गेला, लोकांनी सांगितले आमच्या गावात नदी आणून देईल त्याला आम्ही मतदान करणार. त्याने काय मागावे ठरवावे ना. अनिल भाईदास म्हणाले, नदीही देऊन टाकू. म्हणून म्हणतो मागणाऱ्यांनी काय मागावे हे ठरवावे. निवडणुकीत आम्हाला निवडून यायचे असते म्हणून आम्ही देखील आश्वासने देतो. या सगळ्या गोष्टींचा आपण विचार करायला हवा, असे बाबासाहेब पाटील यांनी म्हटले. त्यांच्या या विधानावरून सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी वर्गाची भावना दुखावली असून, विरोधकांकडून त्यांच्यावर जोरदार टीका केली जात आहे.

----------

### शिवाजीराव दादांनी विविध क्षेत्रात

करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज, माजी आमदार विलासराव खरात, माजी आमदार अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. अभिष्टचिंतन सोहळ्याच्या प्रारंभी गेवराई तालुक्यातील सर्व संत महंतांचा जयसिंग पंडित, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांच्यासह सोहळा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गेवराई तालुक्यातील विविध संस्थानचे संत महंत, नागरिक आणि अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य अभिष्टचिंतन सोहळ्या नंतर काल्याचे कीर्तन संपन्न होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आला. हरिभाऊ बागडे पुढे म्हणाले की, दादांचे ८८ वर्ष वय झाले असतानाही दादा आज तीच ऊर्जा घेऊन काम करत आहेत. म्हणून शिवाजीराव (दादा) यांची शताब्दी याच ठिकाणी साजरी व्हावी व या कार्यक्रमाला माझ्यासह राज्याचे मुख्यमंत्री व सर्व मंत्रिमंडळ हजर राहून त्यांना शुभेच्छा देतील असा विश्वास व्यक्त केला. गेल्या ५० ते ६० वर्षांपासून त्यांची कारकीर्द पाहत आलो आहे. दादा राजकारणात आले आणि गेवराई तालुक्याचा कायपालट केला, असे ते म्हणाले.

-------

### बीड कारागृह अधीक्षकांची

देखील हाच आरोप केल्यानंतर या आरोपाची दखल ग्रह विभागाने घेतली असून, शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर येथून पाच अधिकाऱ्याचे पथक बीडमध्ये दाखल झाले. सायंकाळी त्यांनी कारागृहामध्ये प्रवेश करत पेट्रस गायकवाड यांची चौकशी सुरू केली. या चौकशीमधून काय बाहेर येते याकडे लक्ष लागले आहे.

-------

### घरकुलासाठी मोफत वाळू

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील वाळू व्यवस्थापन आणि घरकुल योजनांना गती मिळावी यासाठी आता तीन वर्षांतून एकदा होणारा वाळू लिलाव दरवर्षी केला जाणार आहे. यामुळे वाळूच्या उपलब्धतेचा प्रश्न सुटणार असून बांधकाम प्रकल्पांना आवश्यक वाळू वेळेवर मिळू शकेल. तसेच, खाणकाम आराखडा, पर्यावरण परवानगी आणि इतर आवश्यक परवानग्यांचा कालावधी एक वर्षावर मर्यादित करण्यात आला आहे. या सुधारणा वाळू तस्करी रोखण्यासाठी आणि पारदर्शक व्यवस्थापनासाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत.एकीकडे सरकारने वाळू धोरणात बदल करून गरीबांना दिलासा दिला असताना, दुसरीकडे वाळू माफियांच्या कारवायांनी प्रशासनालाच धक्के बसत आहेत. त्यामुळे येत्या काळात राज्य सरकारकडून वाळू माफियांवर अधिक कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. वाळूचा गैरव्यवहार रोखण्यासाठी सरकार कितपत प्रभावीपणे कार्य करते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

----------

### विद्युत कर्मचाऱ्यांचा


महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रामध्ये अदानी,टोरेंटो इत्यादी खासगी भांडवलदाराने वीज वितरणाचे मागितलेले परवाने देण्यास विरोध, महावितरण कंपनीत पुनर्रचना,कामगार कपात, ३२९ विद्युत उपकेंद्रे खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देणे, महानिर्मिती कंपनीचे ४ जलविद्युत केंद्राचे खासगीकरण करणे, महापारेषण कंपनी २०० कोटींचे प्रकल्प खासगी कंपन्यांना देणे, पारेषण कंपनीस शेअर मार्केटमध्ये लिस्टिंग करणे,वीज कर्मचार्यांना पेन्शन योजना लागू करणे, लाईन स्टॉप व इतर कर्मचार्यांचे कामाचे आठ तास निश्चित करणे, रिक्त पदे मागासवर्गीयाच्या आरक्षणासह भरणे, कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे, पगारवाढ करारानंतर प्रलंबित असलेल्या तिन्ही वीज कंपन्यांमधील कर्मचार्यांच्या इतर प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी कृती समितीने तीन दिवसांचा संप पुकारला होता. मात्र हा संप मागे घ्यावा यासाठी उर्जामंत्री,एम.एस.ई.बी.होल्डिंग कंपनीने, महाजन्को ,महावितरण, महाट्रान्स्को या विद्युत विभागातील कंपन्यांचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी कृती समितीच्या सातही संघटनाच्या सदस्यांबरोबर चर्चा करण्याचे आवाहन केले आहे. हीबाब लक्षात घेऊन कृती समितीने संप स्थगित केला आहे.

-----------

### जि.प., पं.स. निवडणुकांमध्ये

१९९६ च्या नियमांनुसार चक्रानुक्रमे आरक्षण देता येईल, अशी मुभा निवडणूक आयोगाला मिळाली. यामुळे राज्य सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर नमूद केले. दुरुस्ती आदेशात १९९६ च्या नियमांच्या उल्लेख केल्याने विसंगती निर्माण झाली आहे. १९९६ चे नियम अधिक्रमित झाले आहेत, असे त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी याचिकाकर्त्यांचे वकील मुकुल रोहतगी हेही उपस्थित होते. तुषार मेहता यांच्या सादरीकरणानंतर न्यायालयाने २५ सप्टेंबर, ६ ऑक्टोबर रोजीचे दोन्ही आदेश बदलून एक तिसरा दुरुस्ती आदेश काढणार असल्याचे सांगितले. या आदेशामध्ये २०२५ च्या नियमांचा उल्लेख असेल, असे न्यायालयाने सांगितले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षण हे राज्य सरकारने केलेल्या २०२५ च्या नवीन नियमांनुसार जाहीर होईल, हे स्पष्ट झाले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविषयी बोलताना ॲड. देवदत्त पालोदकर म्हणाले की, आता चेंडू राज्य निवडणूक आयोगाच्या कोर्टात आहे. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण जाहीर केले जाईल, तेव्हा कोणत्या नियमांनुसार आरक्षण दिले गेले आहे ते स्पष्ट होईल. याचिकाकर्त्यांना आरक्षणामध्ये कोणतीही विसंगती आढळली तर त्यांना न्यायालयात दाद मागता येईल.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५

आष्टी येथील जनसेवा इलेक्ट्रिक बाईक शोरूम मधून शरद धोंडे यांनी इलेक्ट्रिक बाईक घेतली असता, चावी देताना पत्रकार शरद रेडेकर पत्रकार राजेंद्र लाड सर व शोरुम चे मालक अँड. रिजवान शेख आदी.

## थोडक्यात...

### उद्या डॉ.शिरीष खेडगीकर यांचे व्याख्यान

अंबाजोगाई । प्रतिनिधी



आंतरभारती शाखा अंबाजोगाईच्या वतीने दि. १२ऑक्टोबर रविवार रोजी गांधी जयंती निमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्ताने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी विविध धर्माची केलेली विवेकी चिकित्सा यावर डॉ. शिरीष खेडगीकर यांचे १२ऑक्टोबर,रविवार रोजी दुपारी चार वाजता,आधार मल्टिस्टेटच्या अजिंठा सभागृहात व्याख्यान होणार आहे.

रविवारी दुपारी ४:३० वाजता,आधार मल्टीस्टेट, जिजामाता कॉलनी, अंबाजोगाई येथे हे व्याख्यान होईल. पुरस्कार वितरण आंतरभारती आंबाजोगाई तर्फे दिला जाणारा आदर्श कार्यकर्ता पुरस्कार यावर्षी सिद्धेश्वर स्वामी यांना जाहीर झाला आहे.त्या पुरस्काराचे वितरण डॉ.शिरीष खेडगीकर यांच्या हस्ते होणार आहे. अशी माहिती अमर हबीब (मार्गदर्शक) प्रा.डॉ. शैलजा बरुरे (अध्यक्ष) व संतोष मोहिते अनिकेत डिघोळकर, महावीर भगरे यांनी दिली.

### छ. शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे माजलगावात भुमिपुजन

माजलगाव । प्रतिनिधी


शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या स्मारकाचा भुमिपुजन सोहळा दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटक म्हणुन आमदार प्रकाश सोळंके हे तर अध्यक्षस्थांनी जिल्हाप्रमुख अनिल जगताप तसेच विशेष उपस्थितीत मा. आ. डि. के. देशमुख, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे यांची उपस्थिती असणार आहे तर प्रमुख उपस्थितीत जयसिंह सोळंके, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, बाजीराव चव्हाण, अच्युत लाटे, दयानंद स्वामी, रोहित देशमुख, खुर्शिद नाईक, सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, अरूण राउत, अविनाश जावळे, खलील पटेल, विजय साळवे, नितीन नाईकनवरे, कचरू खळगे, तुकाराम येवले, चंद्रकांत शेजुळ, सुरेंद्र रेदासणी, डॉ. अशोक तिडके, धनंजय सोळंके, भास्कर शिंदे, राजेंद्र होके, विनायक रत्नपारखी, अर्जुन नाईकनवरे, धम्मानंद साळवे, राजेश घोडे, अभिजित कोंबडे, अमोल शेरकर, कवाडे गटाचे सिध्दार्थ ससाणे, राकेश साळवे, आगारप्रमुख सुहास कोळपकर, मुख्याधिकारी पोपट निघळ, यांची उपस्थिती असणार आहे.





### चित्रावतीबाई उंडाळे यांचे निधन

नेकनूर । प्रतिनिधी



येळंब (घाट) येथील रहिवासी चित्रावतीबाई हरिदासराव उंडाळे (९६) यांना ९/१०/२०२५ रोजी सकाळी ६.३० ला देवाज्ञा झाली. त्यांचा अंत्यविधी पैठण येथील स्मशानभूमीत करण्यात आला. त्या येळंब येथील माजी ग्रामपंचायत सदस्य होत्या, त्यांच्या पश्चात सात मुले , आठ सूना व २९ नातवंडे, नातसुना पंतु असा मोठा परिवार आहे. नेकनुरचे पत्रकार रमेश उंडाळे यांच्या मातोश्री होत्या.

# मोबाईलमुळे ८० टक्के लोक मनोरुग्ण झाले -इंदुरीकर महाराज

आष्टी । प्रतिनिधी

मोबाईलमुळे ८० टक्के रुग्ण मनोरुग्ण आहेत.मोबाईलमुळे लोक वेडे झाले.हे कठोर परंतु वास्तववादी विधान केले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या मानसिक ताण,एकांत आणि व्यसनाधीनतेकडे तरुण जात आहेत.कमीपणा घ्यायची शिका म्हणजेच साधेपणा आणि संतोषाचा अंगीकार करावा.सेवेचा महिमा सर्व महाराज मंडळी पांडुरंगाचे गडी आहेत या ओळीतून त्यांनी सांगितले की,धर्मप्रसारक आणि संतजन हे केवळ ईश्वराचे सेवक आहेत, त्यांच्यात स्वतःचा अहंभाव नसतो.भक्ती ही वंशपरंपरेगत नाही परमात्मा हा रक्तात असावा लागत नाही, असे म्हणत ह.भ.प.निवृत्ती इंदुरीकरण यांनी भक्ती ही कोणत्याही जात,कुल किंवा वंशापेक्षा वेगळी असून ती व्यक्तिगत अनुभवावर आधारित आहे.मोबाईलमुळे ८० टक्के लोक मनोरुग्ण झाले असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुरू असलेल्या सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशी प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली.दुपारच्या चार ते सहा या वेळेत झालेल्या या कीर्तनात महाराजांनी संत तुकाराम महाराज यांचा एक अभंग घेऊन भक्ती, समाजस्थिती आणि आधुनिक जीवनशैलीवर खोलवर विचार मांडले.

यावेळी इंदुरीकर महाराज म्हणाली की,सामूहिकता आणि आनंदाचे आवाहन: शेवटी, सप्ताह म्हणजे संघटन, हसत हसत जगा व शरीराचा चांगला उपयोग करा, या संदेशातून त्यांनी सामूहिक उत्सवाचे महत्त्व, आनंदी जीवनशैली आणि निरोगी शरीरातून परमेश्वराची सेवा करण्याचा संदेश दिला. महाराजांनी स्पष्ट केले की,भक्तीची सुरुवात ईश्वराकडे केलेल्या एकनिष्ठ प्रार्थनेपासून होते.जीवनातील सर्व



आकांक्षा सोडून केवळ 'चित्त तुझ्या पायी राहावे' अशी विनंती हेच खरे तप आहे. भगवंताची बाहेर धरून (धरोनिया बाही) त्यानेच हा भवसागर तरायचा आहे, ही श्रद्धा पक्की झाली पाहिजे.

देवाच्या गुणांचे स्मरण (चतुर तू शिरोमणी! गुणलावण्याची खाणी!): दुसऱ्या चरणात, भक्त आपल्या आराध्यदेवाच्या गुणांचे, लावण्याचे आणि सर्वोत्कृष्टतेचे (शिरोमणी) स्मरण करतो. विठ्ठल रूप हे सर्व दिव्य गुणांची खाण आहे आणि तोच खरा दातारा आहे, अशी भावना मनात रुजवली जाते.आध्यात्मिक प्रकाशाची गरज (करी त्रिमिराचा नाश! उद्यो होऊनी प्रकाश!): महाराज म्हणाले, आपल्या मनातील अज्ञान, मोह आणि कामक्रोधादी विकार (त्रिमिर) यांचा नाश करणारा प्रकाश म्हणजेच परमात्मा आहे. जोपर्यंत हा प्रकाश हृदयात प्रगट होत नाही, तोपर्यंत मनुष्य आशा-निराशेच्या जाळ्यात (आशापाश) अडकून राहतो.

शरणागतीचा शेवटचा टप्पा (तुका ठेवी माथा! पायी आता राखावे!!): अभंगाचा शेवट शरणागतीच्या भावनेने झाला आहे. संत तुकाराम स्पष्ट सांगतात, मी अज्ञानात नासधूस झालो आहे, आता माझी काळजी तुमच्यावर आहे. मी माथा तुमच्या चरणी ठेवला आहे, आता तुमच्याच कृपेने मला रक्षण व्हायचे आहे. ही पूर्ण समर्पणाची भावना आहे. इंदुरीकर महाराजांचे समाजाविषयीचे प्रबोधन

भौतिकवादाचे मरगळ: शरीर थकले, जीवन संपले, अंगातील ताकद व खिशातला पैसा संपला की जगातून संपतो, या उद्गारातून त्यांनी सांगितले की, केवळ भौतिक साधनांवर अवलंबून राहिल्याने जीवन निरर्थक होते. आध्यात्मिक ताकद ही खरी ताकद आहे. रागाचे घातक परिणाम: दोन मिनिटांचा राग तुम्हाला देव बनवू शकतो आणि दोन मिनिटांचा राग आयुष्य संपवितो, असे म्हणताना त्यांनी रागाच्या दुसऱ्या बाजूस (आत्मनियंत्रण) चा उल्लेख केला, पण स्पष्ट केले की अनियंत्रित राग माणसाचा नाश करू शकतो.भक्ती ही वंशपरंपरेगत नाही: परमात्मा हा रक्तात असावा लागत नाही, असे म्हणत त्यांनी भक्ती ही कोणत्याही जात, कुल किंवा वंशापेक्षा वेगळी असून ती व्यक्तिगत अनुभवावर आधारित आहे, हे स्पष्ट केले.सामूहिकता आणि आनंदाचे आवाहन: शेवटी, सप्ताह म्हणजे संघटन, हसत हसत जगा व शरीराचा चांगला उपयोग करा, या संदेशातून त्यांनी सामूहिक उत्सवाचे महत्त्व, आनंदी जीवनशैली आणि निरोगी शरीरातून परमेश्वराची सेवा करण्याचा संदेश दिला, कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधनकार इंदोरीकर महाराजांनी श्रोत्यांना अध्यात्म आणि व्यवहार या दोन्ही क्षेत्रात मार्गदर्शन केले.

## प्रमोद महाजन शासकीय आयटीआयमध्ये रोजगारक्षम अल्पकालीन अभ्यासक्रमाचे उद्घाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई येथे अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रमाचे उद्घाटन बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने (डिजिटल माध्यम) करण्यात आले. त्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथे सहा अल्पकालीन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री महोदय मंगल प्रभातजी लोढा यांचे संकल्पनेतून ही योजना राबविण्यात येत आहे.

आज दिनांक-०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६४७**
**दिनांक - २९/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नवनाथ किसन बरडे रा. सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गायत्री नवनाथ बरडे | मुलगी | १९/०९/२०१८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

# जिल्हा स्त्री रुग्णालय येथे पोलीस प्रशासनाकडून पाहणी



जालना। प्रतिनिधी

जालना येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाला उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी भेट देऊन रुग्णालय परिसराची पाहणी करून. कायदा सुव्यवस्था आढावा घेतलाय यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी कदिम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे जिल्हा स्त्री रुग्णालयाला अधीक्षक डॉक्टर सुदाम गवारे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख मराठा महासंघ कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगेश मोरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी त्यांनी रुग्णालयातील कायदा संस्थेचा आढावा घेतलाय गेल्या आठ दिवसापासून चोऱ्या मोबाईल हीचकणे गांजा पीने यासारखे गंभीर गुन्हे घडत असल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी कधीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांनी आढावा घेतलाय. जिल्हा स्त्री रुग्णालयाला पोलीस चौकीसाठी वरिष्ठाकडे मागणी करणार असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी सांगितले आहे

---

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६५८**
**दिनांक - ३०/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती तान्हाजी भानुदास बरडे रा. सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जिवन तान्हाजी बरडे | मुलगी | ०२/०२/२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-३०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६६२**
**दिनांक - ३०/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अंकुश काशिनाथ बरडे रा. सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवानी अंकुश बरडे | मुलगी | ०१/०९/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-३०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६६३**
**दिनांक - ३०/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अंकुश काशिनाथ बरडे रा. सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भारती अंकुश बरडे | मुलगी | २६/०५/२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-३०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

# पालिकेचेआयुक्त यांच्या निवासस्थानावर दिव्यांगांचा ताबा



जालना। प्रतिनिधी

दिव्यांगांना घरकुल आणि जागा देण्यात यावं या मागणीसाठी अनेक आंदोलने मोर्चे निवेदने दोन वेळेस आमरण उपोषण करूनही महानगरपालिका जाग येत नसल्याने दिव्यांगांनी थेट आयुक्त संतोष खांडेकर यांचा शासकीय बंगला वर ताबा करून निवासस्थानी ठाय्या आंदोलन करत असताना आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितले की महानगरपालिकेत या तिथं सविस्तर चर्चा करतो इथं येऊ नका दिव्यांगानी महानगरपालिकेत जाऊन आयुक्त संतोष खांडेकर यांची भेट घेऊन सोमवार पर्यंत प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठवण्यात असल्याचे त्यांनी सांगितले आहे दिव्यांग आणि थेट सहाय्यक आयुक्त अनुराधा नागोरी यांची भेट घेऊन दिव्यांकांचा प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठवा अशी मागणी केल्यानंतर दिव्यांग विभागाला आजच प्रस्ताव तयार करून महसूल विभागाकडे पाठवण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त नागरी यांनी दिव्यांग विभागाला दिले आहे.

यावे सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे शिवसेना दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदुले शेख इसमेल राजेश कावेटी जगदीश सातपुते सतीश वाघ आदींची उपस्थिती होती

# आ.धस पुत्र जयदत्तच्या कार्यकर्त्यांनी मलाच मतदान केले

## राष्ट्रवादीचे खा.बजरंग सोनवणे यांच्या विधानाने आष्टी तालुक्यात खळबळ

आष्टी । प्रतिनिधी

मागील लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपा खासदारांसाठी प्रचार करणाऱ्या जयदत्त धस यांच्या गाडीत फिरणाऱ्या कार्यकर्त्यांनीही मलाच मतदान केले मी त्यांचा ऋणी आहे असे म्हणून खा. बजरंग सोनवणे यांनी खळबळ उडवून दिली. त्याचबरोबर आगामी जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये मी जयदत्त यांनाच मदत करणार अशी ग्वाही यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी देऊन स्वतःच्या पक्षाच्या उमेदवाराला वाऱ्यावर सोडणार हे ही स्पष्ट केले .एका खाजगी कार्यक्रमात बोलताना दिली. आष्टी शहरातील वैभवात भर घालणाऱ्या भक्ती पिवर व्हेज रेस्टॉरंट उद्घाटन प्रसंगी बीड जिल्ह्याचे दबंग खासदार बजरंग बप्पा सोनवणे बोलत होते.

यावेळी भक्ती व्हेज रेस्टॉरंट चे उद्घाटन आ. सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाचे बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, देविदास आबा धस, राष्ट्रीय स्वयंक संघाचे ज्येष्ठ नेते श्रीधर पंत सहस्रबुद्धे ,नामधारक आसाराम महाराज केळसांगवीकर, सरपंच अशोक पवार,आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, अँड बाबुराव अनारसे, आष्टी नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष भारत मुरकुटे, जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष डॉ शिवाजीराव राऊत,अजित दादा पवार गटाचे अध्यक्ष काका शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष सुनील नाथ, युवा नेते जयदत्त धस, जि प सदस्य तथा राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे युवक जिल्हा उपाध्यक्ष सतीश आबा शिंदे, कासारी चे सरपंच संदीप खकाळ , त्रिदल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे , प्रगतशील शेतकरी अशोक भोसले , राजाभाऊ रासकर संतोष ओहाळ, अशोक पोकळे,आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भक्ती प्युअर व्हेज रेस्टॉरंट चे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी बोलताना बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे म्हणाले की माझे आणि आष्टीचे फार जुने नाते आहे.मी आष्टीकारांना फार चांगला ओळखतो. ते नेहमी सत्याच्या बाजूने व चांगल्या माणसाच्या बाजूने उभे राहतात. त्याच पद्धतीने मागे झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार यांच्याबरोबर आष्टीतील लोक शरीराने होते. मात्र मनाने ते माझ्याबरोबरच होते. त्यांनी मला भरभरून साथ दिली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. आष्टीचे आमदार सुरेश आण्णा धस माझे चांगले मित्र आहेत. मात्र त्यांनी माझे काम केले नाही हे मी मान्य करतो. मात्र जयदत्त ने संपूर्ण मतदारसंघ पिंजून जरी काढला असला तरी त्याच्या गाडीतील कार्यकर्त्यांनी देखील मलाच मतदान केले. असे बोलून उपस्थितांमध्ये एकच राजकीय खळबळ उडवून दिली. जयदत्त ने मला इकडे येण्या अगोदर फोन केला तुमचे मतदारसंघांमध्ये स्वागत आहे. जयदत्त माझ्या नेहमी संपर्कात असतो. उद्या जयदत्तच्या कुठल्याही निवडणुकीमध्ये मी जयदत्त ला मदत करेल अशी ही ग्वाही त्यांनी दिली यावेळी भक्ती प्युअर व्हेज रेस्टॉरंट चे मालक यशस्वी उद्योजक संपत शेठ गाडे यांनी उपस्थित आमचे आभार मानले व आपण फार गरीबी मधून मोठ्या हुशारीने कष्टाने हे यश संपादन केले आहे माझ्या आज पतसंस्थेमध्ये जवळपास २२ कोटीची उलाढाल आहे भक्ती प्युअर व्हेज च्या माध्यमातून मी नक्कीच अष्टीकरांना चांगल्या प्रतीचे जेवण व चांगली सेवा देण्याचे काम करेल आज माझ्या या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर सर्व पक्षातील पुढाऱ्यांनी विशेष करून बीड जिल्ह्याचे खासदार माझे मित्र बजरंग सोनवणे हे देखील उपस्थित राहिले त्यांचे विशेष आभार मानतो तसेच आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी देखील माझ्या रेस्टॉरंटचे उद्घाटन ◀◀ पान २ वर

# कपिलधारवाडी व हिंगणी खुर्द पुनर्वसनाबाबत जिल्हास्तरीय बैठक

बीड । प्रतिनिधी

मौजे कपिलधारवाडी व मौजे हिंगणी खुर्द (ता. बीड) या गावांच्या पुनर्वसनासंदर्भात आज दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण जिल्हास्तरीय बैठक पार पडली.



या बैठकीत पुनर्वसन प्रक्रियेतील आवश्यक टप्प्यांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी महोदयांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन पुनर्वसनाचे काम नियोजनबद्ध व तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अप्पर जिल्हधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा संगीता पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख शिंदे, कार्यकारी अभियंता तोंडे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, ◀◀ पान २ वर

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची बैठक

बीड । प्रतिनिधी

आगामी बीड नगर परिषद निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे बीड शहरातील कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक आरक्षण सोडतीनंतर आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस भवन,बार्शी रोड,बीड येथे होणार असून या बैठकीस आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि अन्य वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर सविस्तर चर्चा होणार आहे. बीड शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# अतिवृष्टीतील उत्कृष्ट कार्याबद्दल तहसीलदार शेळके यांचा भाजपाच्या वतीने सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यात गेल्या दोन महिन्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या काळात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी प्रशासनाचा समन्वय साधत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उल्लेखनीय कार्य केले. नुकसानीचे पंचनामे करणे, पूरग्रस्त भागांची पाहणी, मदत वितरणाचे नियोजन अशा विविध जबाबदाऱ्यांचे प्रभावीपणे पालन केल्यामुळे बीड तालुक्याला राज्य सरकारने जाहीर केलेल्या मदत पॅकेजचा मोठा लाभ मिळणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा भाजपाच्या वतीने सत्कार करण्यात आला.अतिवृष्टीच्या काळात तहसीलदार शेळके यांनी रात्रंदिवस काम करून प्रशासनाला सज्ज ठेवले. शेतकऱ्यांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांच्या मदतीसाठी ते सदैव अग्रभागी राहिले. त्यामुळेच बीड तालुक्याला शासनाच्या मदतीचा अधिकाधिक लाभ मिळेल यात शंका नाही.डॉ. वनवे यांनी पुढे सांगितले की,राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणि त्यांनी अतिवृष्टीग्रस्त भागात प्रत्यक्ष पाहणी केल्यामुळे मराठवाडा आणि बीड जिल्ह्याला भरघोस मदत मिळाली आहे. या कार्याचे संपूर्ण ◀◀ पान २ वर

# पात्रुड-लऊळ रस्ता ठरतोय प्रवाशांचा कर्दनकाळ शेतकऱ्यांच्या जीवाला धोका, प्रशासनाचे दुर्लक्ष

पात्रुड । प्रतिनिधी

पात्रुड ते लऊळ हा अवघा ४ किलोमीटरचा रस्ता शेतकऱ्यांच्या व रहिवाश्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. दोन्ही गावांदरम्यानच्या परिसरात शेकडो एकर शेती आहे. दररोज शेतात जाण्यासाठी, शेतीमाल ने-आण करण्यासाठी आणि बाजारपेठेत जाण्यासाठी या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र, या रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की आता तो रस्ता आहे का नाही हाच प्रश्न पडत आहे.

रस्त्यावरील मोठमोठे खड्डे वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरत आहेत. काही खड्डे तर इतके खोल आहेत की त्यात माणूस



पूर्णपणे सामावून जाईल इतकी त्यांची खोली आहे. या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने प्रवाशांना खड्ड्यांचा अंदाजच येत नाही, परिणामी दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होतात. गेल्या काही दिवसांत असे अनेक बरेच अपघात घडले असून खूप प्रवाशी जखमी झाले आहेत.

परिसरातील शेतकऱ्यांना हा प्रवास म्हणजे अक्षरशः परीक्षा ठरतो आहे. पेरणी, फवारणी किंवा जनावरांना चारा आणण्यासाठी निघालेला शेतकरी रस्त्यातील खड्डे चुकवताना वेळ आणि जीव धोक्यात घालतो. रात्रीच्या वेळी तर परिस्थिती आणखी बिकट होते, कारण रस्त्यावर प्रकाशाचीही कोणतीही सोय नाही. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली, परंतु अद्याप त्यांच्या कडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. काही ठिकाणी मुरूम टाकून तात्पुरती सोय ◀◀ पान २ वर

# दिवाळीपूर्वी शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत पिकांचा चिखल झाल्याने शेतकरी हवालदिल!

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतील खरीप हंगामातील पिकांचा चिखल झाल्याने दिवाळी सणा पुर्वी शेतकरी सरकारच्या मदतीची चातका प्रमाणी वाट पाहात आहे, मदत सणा पुर्वी न मिळाल्यास अनेक शेतकर्यांचा घरात पंणती लागणार नसल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे, खरीप पिकांचा जीवावर समाधानानी दिवळी साजरा करणारा बळीराजा अतिवृष्टी मुळे



हवालदिल झाल्याने बळीराजा आता मदतीच्या प्रतिक्षेत आहे, जगाचा पोशिंदा बळीराजा हा अतिवृष्टीमुळे हवालदिल झाला असुन अक्षरशा सरकारी मदतीवर हा दिवाळी सण साजारा करण्याची वेळ आली आहे. भारत हा कृषी प्रधान देश असल्याने संपुर्ण जगाला अन्नधान्य पुरवणारा शेतकर्यांवर अतिवृष्टीने गुडघे टेकण्याची वेळ यावी हे दुदैव आहे, खरीप हंगामातील कापुस, सोयाबीन, तुर, मुग, बाजारी, हे पिके चिखलात गेल्याने गेवराई तालुक्यातील बळीराजा पुरता खचला आहे, विशेष म्हणजे गेवराई तालुक्यातील सिंदफणा, गोदावरी नदी काठा लगतच्या गांवातील परिस्थिती तर भयावह आहे, ◀◀ पान २ वर

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी पंचनामे सुरू

## व्हायरल झालेली गावांची यादी अधिकृत नसल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.**

दरम्यान, समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही. या यादी बाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही, असा चुकीचा संदेश समाजमाध्यमांतून प्रसारित होत आहे.

त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की, व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही.

पंचनामे अद्याप सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा.

जिल्हा प्रशासन आपल्या नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# आज ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडी बीड जिल्ह्यात

**बीड । प्रतिनिधी**

संतभूमी मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांना आळा घालण्यासाठी वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने एक अनोखी सामाजिक चळवळ उभारली जात आहे. शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी आणि आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडी संपूर्ण मराठवाड्यात प्रबोधन करत आहे. उद्या बीड जिल्ह्यात दिंडी येणार आहे. या मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन वारकरी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्री ह भ प रामेश्वर महाराज धपाटे यांनी पत्रकार परिषदेत केले.

बीड जिल्ह्यात या दिंडी मधून शेतकरी समस्यांबाबत करण्यात जनजागृती येणार आहे. शेतकऱ्यांना आत्मविश्वास, आशा आणि श्रद्धेचा नवा आधार देण्यासाठी हजारो



वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा उपक्रम राबवला जाणार आहे. वारकरी साहित्य परिषदेचेसंस्थापक अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल पाटील (काकाजी) आणि सचिव डॉ. सदानंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही दिंडी संतभुमी मराठवाड्यात भ्रमंती करत आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या बातम्या थांबल्या पाहिजेत ;वारकरी संप्रदाय ही सामाजिक जबाबदारी मानून पुढे येत आहे, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला आहे. या ज्ञानोबा-तुकोबा आधार दिंडी चा ११ ऑक्टोबर रोजी बीड येथे आगमन होणार असून, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात भव्य स्वागत व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाच्या कीर्तन, प्रवचन, अभंग व भजनी मंडळांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

## शेतकऱ्यावर अस्मानी संकटानंतर

# मोटार चोराचे संकट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यावर अस्मानी संकट आले असून त्यामध्ये आता शेतकऱ्याच्या शेतातील बोरमधील पाणी मोटार पाईप मोठ्या प्रमाणावर चोरी जाण्याचे प्रकार वाढले असून यावर पोलीस प्रशासनाने वचक ठेवला पाहिजे अशी प्रतिक्रिया शेतकरी बांधवातून मागणी होत आहे पाटोदा शहराचे माजी सरपंच परमेश्वर अडागले यांच्या शेतातून मंगळवारी ३४ हजार रुपयांचे पाणी मोटार व साहित्य चोरी गेली असून शहरात भुरट्या स्वराचे प्रमाण वाढले असून ठेवणे आवश्यक आहे असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे व्हिडिओकॉन कंपनीची मोटर या कंपनीची मोटर पुढे खरेदी-विक्री होत असल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा ९४ २२ ६६ ९४ या नंबर वर मोटर आढळल्यास संपर्क साधा.

# परळी तहसीलचा शेतकऱ्यांनी घेतला ताबा-किसान सभा आक्रमक

## सरकार, प्रशासन झोपेत तर शेतकरी रस्त्यावर, सहकार मंत्र्यांच्या वक्तव्याचा निषेध

परळी । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे पीक नुकसानाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण पीक कर्जमाफी व शेतातली काम ठप्प झाल्याने शेतमजुरांना तीस हजार रुपये श्रम भरपाई मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी तहसील मध्ये घुसून निदर्शने आंदोलन केले. यावेळी तहसीलदार यांनी आंदोलनकर्त्यांना अरेरावी करत पोलीस कार्यवाही करण्याची आंदोलनकर्ते शेतकऱ्यांना धमकी दिल्याने परिस्थिती चिघळली. कर्जमाफी द्या, मदत करा नसता खुर्च्या रिकाम्या करा अशी घोषणाबाजी



करत सरकारला जाग येणार नसेल पुढच्या वेळी सरकारी कार्यालय ताब्यात घ्यायला सुद्धा मागे पुढे पाहणार नाही असा सज्जड इशारा ही प्रशासनाला दिला.

यावर्षीचा खरीप हंगाम पूर्णपणे हातचा निघून गेला असून पुढील रब्बीच्या पेरणी करिता शेतच राहिली नाहीत अशा परिस्थितीत सरकार कडून जाहीर करण्यात आलेल्या मदतीत मात्र आकड्याचा खेळ करत अनेक बाबतीत शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आली आहे. खरवडून गेलेल्या फक्त अल्प आणि अतीअल्प भूधारक शेतकऱ्यांना मदत (२ हेक्टर), आपत्ती मदत मिळण्यासाठी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ अथवा अनुदान घेतलेले नसावे असे ◀◀ पान २ वर

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष आर. जी. कानडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या संयुक्त विद्यमाने आशिया अखंडातील सर्वात मोठी असलेलेली बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक,आधारस्तंभ,राधेशाम चांडक हे ७५ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रम सहकार मंदिर बुलढाणा येथे आयोजित



मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

करण्यात आला होता.

सदरील अमृत सोहळा कार्यक्रमांमध्ये माजलगावचे भूषण,सहकार रत्न, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष आर.जी कानडे यांना नामदार राधाकृष्ण विखे पाटील,जलसंपदा मंत्री ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निलेश घायवळच्या वकिलांचा मोठा दावा; गोळीबारातील आरोपींशी संबंध नाही अन् ओळखतही नाही

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरूड गोळीबारानंतर निलेश घायवळ याच्या वकिलांनी मोठा दावा केला आहे. निलेश घायवळ आणि गोळीबार केलेल्या आरोपींचा काहीही संबंध नाही आणि निलेश घायवळ त्यांना ओळखत नसल्याचा दावा केलाय. तसेच पोलिसानी मिडियाच्या दबावाखाली येऊन निलेश घायवळ याचे कनेक्शन गोळीबाराशी जोडले आहे का? यासाठी निलेश घायवळ याच्या वकिलांकडून रिट पिटीशन दाखल करण्यात आली आहे.

ही रस्त्यावरती अचानक झालेली भांडण आहेत प्रकरणी बोलताना निलेश घायवळचे वकील विपुल दुशींग यांनी बोलताना म्हटलं की, रिट पिटीशनद्वारे रस्त्यावरती अचानक झालेल्या भांडणातून एका गटातून दुसऱ्या गटाला गोळीबार केला. त्या गोळीबारामध्ये तो व्यक्ती जखमी झाला अशी केस आहे. पुणे



पोलिसांकडून देखील पहिल्या दिवशी जी काही बातमी देण्यात आली होती. त्यांचा म्हणणं असं होतं की, यामध्ये कोणते गँग रियल रीजनचा संबंध येत नाही. ही रस्त्यावरती अचानक झालेली भांडण आहेत आणि त्याच्यामुळे त्याच्यामध्ये कोणत्याही गँग नाव नाही. परंतु माध्यमांकडून येणाऱ्या प्रेशरमुळे कदाचित त्यांनी निलेश घायवळला याच्यामध्ये घेतलं. त्याचं नाव या घटनेमध्ये टाकलं का? हे तपासून पहावं. त्यासाठी आम्हीही रिट पेटिशन कोर्टात दाखल केली आहे. निलेश घायवळच्या म्हणण्याप्रमाणे मारेकरी आणि निलेश घायवळ गँगचे आत्ता जे तथाकथित मारेकरी आहेत, जे पकडले गेलेले, त्या लोकांची आणि निलेशची कुठल्याही प्रकारे ओळख नाही त्यांची गाठभेट नाही. त्यांनी कधी एकमेकांना फोनवर सुद्धा बोललेले नाहीत, असं असताना देखील त्याचं नाव या प्रकरणांमध्ये गोवण्यात आलं ही गोष्ट त्यांनी कोर्टामध्ये चॅलेंज केलेली आहे, असं घायवळचे वकील विपुल दुशींग यांनी म्हटलं आहे.

निलेश घायवळ याची आई कुसुम घायवळ यांनी म्हटलं की, माझ्या लेकराला कुठंही पळून जायचं नव्हतं. तो पळून गेला नाही. मी स्वत: त्याला विमानतळावर सोडायला गेले होते. त्याने कोणताही पासपोर्टमध्ये घोटाळा केला नाही. राजकारणी लोकं त्याला त्रास देण्यासाठी असं करत आहेत. निलेश घायवळला राजकारणात प्रवेश करायचा होता. दोन महिन्यावर ज्या निवडणुका आल्या आहेत. त्याला निवडणुकीत उभं रहायचं होतं, असंही त्यांनी म्हटलंय आहे.नगर जिल्ह्यातील सोनेगावच्या जिल्हा परिषदतून निलेश उभं राहणार होता, मात्र विरोधकांनी कट रचून त्यांना अडकवल्याचा दावा निलेश घायवाळच्या आई कुसुम घायवळ यांनी केला आहे. सोनेगावमध्ये त्याला राजकारणात डोकं वार काढू दिलं जात नव्हतं, त्यामुळे त्याला त्रास दिला जात होता, असं त्यांनी म्हटलं आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार पुण्यात पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांची बैठक

**पुणे । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात झाल्यानंतर संघटनेची तयारी काय आहे? याची झाडाझडती घेण्यासाठी (ता. ११) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुण्यात पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहे. महापालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी काय तयारी केली आहे याचे उत्तर पदाधिकाऱ्यांना द्यावे लागणार आहे.



गेल्या तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता या निवडणुका घेण्यासाठीची लगबग सुरु झाली आहे. जिल्हा परिषद, महापालिका यासह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रभाग रचना अंतिम झाली आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व निवडणुका पार पडून निकाल जाहीर होतील अशी शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर आता या निवडणुकांसाठी भाजपने कंबर कसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः यामध्ये लक्ष घालून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचे शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, आमदार, खासदार, प्रदेश पातळीवरील पदाधिकारी, शहर व जिल्हा कार्यकारिणीतील महत्त्वाचे पदाधिकारी यांची बैठक डीपी रस्त्यावरील शुभारंभ लॉन्स येथे सकाळी १० पासून होणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत फडणवीस थेट पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. भाजपने काही आठवड्यांपूर्वी नवे जिल्हाध्यक्ष व शहराध्यक्ष जाहीर केले. त्यानंतर पक्ष संघटनेची रचनेसह पदाधिकारी पक्ष मजबूत करण्यासाठी काय करत आहेत? सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी काय केले? याची उत्तरे पदाधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहेत. दरम्यान आगामी निवडणुकीचा क्शन प्लॅन काय असणार आहे, फडणवीस काय मार्गदर्शन करणार याकडे पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कर्वेनगर येथील धनुर्विद्या क्रीडा संकुलाचा मार्ग अखेर मोकळा; दुधानेंच्या पाठपुराव्याला यश

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कर्वेनगर प्रभागात धनुर्विद्या संकुलाकरिता गेल्या साडेतीन ते चार वर्षांपासून माजी नगरसेविका लक्ष्मी दुधाने आणि शरदचंद्र पवार पक्षाचे कोथरुड विधानसभा अध्यक्ष स्वप्निल दुधाने यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. यासाठी निधी उपलब्ध करत सातत्याने केलेल्या या पाठपुराव्यास यश आले आहे. यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या विशेष सहकार्यातून वेळोवेळी शासन दरबारी आणि अन्य ठिकाणीही सर्वतोपरी प्रयत्न केले. या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे. येत्या १६ तारखेला क्रीडा संकुलाचा भूमिपूजन सोहळा होणार आहे.

याबाबत माहिती देताना स्वप्निल दुधाने म्हणाले की, पुण्यनगरीतील कर्वेनगर येथे पुणे महानगरपालिकेचे पहिले धनुर्विद्या संकुल म्हणून ओळखले जाणारे हे संकुल पुणे शहरातील अनेक खेळाडूंच्या स्वप्नांना पंख देणारे आहे. यासाठी जागा उपलब्ध व्हावी, म्हणून जमीन मालक असणाऱ्या शेतकरी वर्गाला विश्वासात घेऊन जमिन पुणे मनपाकडे हस्तांतरीत करण्यात आली. त्यानंतर पुणे मनपाच्या वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद व्हावी, यासाठी तब्बल तीन वर्षे प्रयत्न करण्यात आले असून, सर्व तांत्रिक अडचणी, शासकीय परवानगी तसेच वेळोवेळी केलेला पाठपुरावा यानंतर हा प्रकल्प उभारत आहे. खासदार सुप्रिया



सुळे यांच्या विशेष सहकार्यातून आजमितीस तब्बल १ एकर आरक्षित जागेवर हा प्रकल्प साकारत असताना सदर काम अत्यंत उत्कृष्ट आणि उच्च दर्जाचे व्हावे, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, अशी माहिती दुधाने यांनी दिली. गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर रोजी हा भूमिपूजन सोहळा खासदार सुप्रिया सुळे यांच्या शुभहस्ते आणि मनपा आयुक्त नवल किशोर राम आणि पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत असून, ही आमच्यासह अनेक खेळाडूंची स्वप्नपूर्ती असेल, यात शंकाच नाही. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आपण सर्वांनी आवर्जून उपस्थिती दर्शवत कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन दुधाने यांनी केले.

# जिल्ह्यातील १६ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या; बारामती तालुका पोलिस ठाण्याचा पदभार चंद्रशेखर यादव यांच्याकडे

**बारामती । प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस दलातील ११ पोलिस निरीक्षकांच्या पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी बदल्या केल्या. पाच सहायक पोलिस निरीक्षकांच्या देखील बदल्या करण्यात आल्या. बहुचर्चित बारामती तालुका पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक वैशाली पाटील यांची वर्षभरातच बदली करण्यात आली आहे. बारामती वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची तेथे नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षकांनी बदल्यांचे आदेश जारी केले. पोलिस निरीक्षकांच्या बदल्या पुढीलप्रमाणे (कोठून-कुठे) : कुमार रामचंद्र कदम (वडगाव मावळ ते सासवड), सचिन दत्तात्रय वांगडे (हवेली ते उरुळी कांचन), रवींद्र दत्तात्रय पाटील (कामशेत ते नियंत्रण कक्ष), सहायक पोलिस निरीक्षक महादेव चंद्रकांत शेलार (नारायणगाव ते स्थानिक गुन्हे शाखा),

अभिजित सुभाष देशमुख (परकीय नागरिक नोंदणी कक्ष ते वडगाव मावळ), वैशाली रावसाहेब पाटील (बारामती तालुका ते हवेली), शंकर मनोहर पाटील




(उरुळी कांचन ते कामशेत), चंद्रशेखर मोहनराव यादव (बारामती वाहतूक शाखा ते बारामती तालुका), श्रीशैल रामचंद्र चिवडशेट्टी (नियंत्रण कक्ष ते बारामती वाहतूक), ऋषिकेश भाऊसाहेब अधिकारी (सासवड ते नियंत्रण कक्ष),

सहायक पोलिस निरीक्षक नितीन हनुमंत खामगळ (वेल्हा ते नियंत्रण कक्ष), सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण महादेव सपांगे (यवत ते नारायणगाव), किशोर विठ्ठल शेवते (वाचक अपर पोलिस अधीक्षक, पुणे ते वेल्हा) आणि सहायक पोलिस निरीक्षक गजानन रतन चेके (वाचक उपविभागीय पोलिस अधिकारी बारामती ते नियोजित पोलिस ठाणे निरा-नृसिंहपूर).

# अल्पवयीन मुलीवर अत्याचारप्रकरणी आरोपीला २० वर्षे कारावास

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीला शिवाजीनगर सत्र न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावास आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त सश्रम कारावास भोगावा लागणार आहे.



अनिस नैस महम्मद (वय-३६, रा. महम्मदवाडी, पुणे) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१९ मध्ये घडलेल्या या प्रकरणात आरोपीने परिसरात खेळत असलेल्या अल्पवयीन मुलीला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून आपल्या खोलीत नेले. ती अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही तिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केला. याबाबत मुलीच्या कुटुंबीयांनी कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार आरोपीविरुद्ध लैंगिक अत्याचार आणि 'पोक्सो' कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सबळ साक्षीपुराव्यांनंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. डी. शिरभाते यांनी आरोपीला शिक्षा सुनावली. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वराज पाटील यांनी केला. त्यांनी आरोपीविरुद्ध ठोस पुरावे गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने प्रभावीपणे बाजू मांडली. सरकारी पक्षाचे वकील नितीन कोंघे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर आणि कोर्ट पैरवी अधिकारी महेश जगताप, विजय माने, अंकुश बनसोडे, अमोल हिरवे, मयूर मोरे यांनी या प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावली. या कामगिरीबद्दल पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी तपास पथकासह कोर्ट पैरवी अधिकाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

# 'एनडीएतील प्रथम सत्रातील कॅडेटची आत्महत्या'; चौकशी समिती नेमली

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स अकॅडमी (एनडीए) मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रथम सत्रातील कॅडेट अंतरिक्ष कुमार सिंह याने आज पहाटे आत्महत्या केली. एनडीए प्रशासनाने या घटनेची अधिकृत पुष्टी केली असून, घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी कोर्ट ऑफ इन्कायरी (चौकशी समिती) नेमण्यात आली आहे.

एनडीएच्या माहितीनुसार, पहाटेच्या वेळी नियमित प्रशिक्षणासाठी उपस्थित न राहिल्याने सहकारी कॅडेट्सनी अंतरिक्ष याच्या केबिनकडे धाव घेतली असता तो बेशुध्द अवस्थेत आढळला. त्याला तत्काळ खडकवासला येथील मिलिटरी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. मात्र सकाळी साडेसहा वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती तातडीने स्थानिक पोलिस तसेच कुटुंबीयांना देण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

एनडीए प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कॅडेट



अंतरिक्ष कुमार सिंह यांच्या निधनाची बातमी अत्यंत दु:खद आहे. या कठीण प्रसंगी एनडीए परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. एनडीएमधील हा प्रकार अकॅडमीतील शिस्तबद्ध आणि कडक प्रशिक्षण पद्धतीदरम्यान घडलेला असल्याने, कॅडेट्सच्या मानसिक आणि शारीरिक ताणावाबाबतही तपासात विचार केला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आयुक्तांच्या आदेशानंतर अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई

**बाणेर । प्रतिनिधी**

शहर विद्रूप करणाऱ्या अनधिकृत फ्लेक्सबाजीवर कारवाई करण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी क्षेत्रीय कार्यालयाला दिले आणि कारवाईला सुरुवात झाली आहे. त्यामुळे चौकाचौकांत झळकणारे फ्लेक्सचे आता सांगाडेच राहिले आहेत. आयुक्तांच्या आदेशानुसार आता कारवाईला सुरुवात झाली असून, ही कारवाई किती दिवस सुरू राहणार, याकडे मात्र सर्वांचे लक्ष लागले आहे. कार्यक्रम होण्याआधी कार्यक्रमाचे बोर्ड निघाले तर अनधिकृत बोर्ड लावण्याचे प्रमाणही कमी होईल, असे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

सध्या आकाशचिन्ह विभागामार्फत औंध, बाणेर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई करीत चार जाहिरातदारांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. परंतु, यामध्ये व्यावसायिक जाहिरातदारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राजकीय अनधिकृतपणे फ्लेक्स लावणाऱ्यांवरही गुन्हे दाखल होणार का? हे पाहावे लागणार आहे. पुणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी स्वतः परिमंडल चारमध्ये भेटी दिल्या. त्यामध्ये त्यांनी



दिलेल्या सूचनांनुसार बुधवारी दिनांक ८/१०/२०२५ रोजी उपायुक्त परवाना आकाशचिन्ह विभाग माधव जगताप यांच्या आदेशानुसार, परिमंडल २ उपायुक्त संतोष वारुळे, महापालिका सहाय्यक आयुक्त गिरीश दापकेकर यांच्या मार्गदर्शनाखाली परवाना निरीक्षक योगेश काकडे, परवाना निरीक्षक अमोल जोरे, परवाना निरीक्षक शरद हिले, संतोष कोळपे, चंद्रकांत भोसले यांच्या टीममार्फत बोपोडी चौक, आंबेडकर चौक, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पहाड, मांडववर कारवाई करण्यात आली. तसेच, ४ जाहिरातदारांवर गुन्हा नोंदविण्यात आले.

अनधिकृतरीत्या लावण्यात येणाऱ्या फ्लेक्समुळे परिसर विद्रूप होत आहे. त्यामुळे या अशा अनधिकृत जाहिरातदारांच्या विरोधात सातत्याने कारवाई करणे गरजेचे आहे. अनेकवेळा पुणे महानगरपालिकेतर्फे कारवाई केल्यानंतर लगेच एक-दोन दिवसांत पुन्हा परिसर फ्लेक्सने भरून जात आहे. त्यामुळे अशा अनधिकृत फ्लेक्सवर सातत्याने कारवाई करून आजच्या जाहिरातदारांवर गुन्हे दाखल करावेत, असे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

# अविनाश लगड यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**पुणे । प्रतिनिधी**

युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यरत असलेले अविनाश लगड यांनी आज महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला.



या प्रसंगी त्यांच्या सोबत अनेक सहकाऱ्यांनीही पक्षप्रवेश केला. युथ फाऊंडेशन माध्यमातून वेगवेगळया सामाजिक प्रश्नांसह, युवकांसाठी रोजगार, महिला, ज्येष्ठनागरीक यांच्यासाठी वेगवेगळया सामाजिक उपक्रमांकाच्या माध्यमातून लगड यांनी मोठा जनसंपर्क निर्माण केला आहे. लगड म्हणाले, युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजकार्य करत असताना मला जाणवले की, समाजकार्यास राजकारणाची जोड मिळाली तर ते कार्य अधिक प्रभावी व अचूक होते. त्यामुळेच मी अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याला पक्षात सामावून घेत माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो सार्थ करण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन, असेही त्यांनी सांगितले. लगड यांनी स्पष्ट केले. तसेच महिला आरोग्याच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यासह, आपल्या मित्रपरिवार, लगड कुटुंब, स्नेही व सर्व समर्थकांचेही त्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त करत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे ते म्हणाले.

# पुण्यात मनाचे श्लोक चित्रपट बंद पाडला!

**पुणे । प्रतिनिधी**

मराठमोळी अभिनेत्री मृण्मयी देशपांडे हिने दिग्दर्शित केलेला 'मनाचे श्लोक' हा मराठी चित्रपट आज शुक्रवार, १० ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला आहे. मात्र हा चित्रपट पुण्यातील धायरी भागातील अभिरूची मॉलमधील थिएटरमध्ये बंद पाडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या चित्रपटाच्या नावावरून आधीच वादंग निर्माण झालं होतं. यापूर्वीच या चित्रपटाला पुण्यातून विरोध करण्यात येत आहेत. समर्थ रामदास स्वामी महाराजांनी रचलेल्या 'मनाचे श्लोक' या पवित्र ग्रंथाच्या नावाचा वापर चित्रपटासाठी केल्यामुळे या चित्रपटावरून वादंग निर्माण झाले होते. हिंदू जनजागृती समितीने या चित्रपटाला तीव्र विरोध दर्शवला होता आणि हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखा प्रकार असल्याचा आरोप करण्यात आला होता. याशिवाय , समस्त हिंदू आघाडीचे नेते मिलिंद एकबोटे यांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली होती. चित्रपट दिग्दर्शकांना कसली आली लिबर्टी? लिबर्टीच्या नावाखाली काहीही करायचं का? 'मनाचे श्लोक' हा शब्द वापरायलाच कशी परवानगी दिली? जर हा चित्रपट प्रदर्शित झाला, तर आम्ही तो हाणून पाडू,




आम्हाला तुरुगात जायची भीती नाही, असा इशारा मिलिंद एकबोटे यांनी दिला होता. तर हिंदू जनजागृती समितीचे प्रवक्ते पराग गोखले यांनी सांगितले होते की, समर्थ रामदास स्वामी महाराजांनी लिहिलेले मनाचे श्लोक हे पवित्र धार्मिक साहित्य आहे. या नावाचा वापर चित्रपटासाठी करणे हे केवळ श्रद्धेचा अपमानच नाही, तर धार्मिक भावनांना ठेस पोहोचवणारे आहे. तसेच त्यांनी पुढे म्हटले होते की, मनाचे श्लोक हे शीर्षक चित्रपटातून त्वरित मागे घ्यावे आणि केंद्र तसेच राज्य शासनाने भविष्यात अशा धार्मिक प्रतीकांच्या अविचारी वापरावर बंदी घालण्यासाठी कायदा करावा.

# वडगाव मावळ नगरपंचायतीची आरक्षण सोडत जाहीर

***पुणे । प्रतिनिधी***

महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होणार आहेत. यासाठी जोरदार तयारी सुरु आहे. प्रशासनाकडून देखील तयारी अंतिम टप्प्यामध्ये आली आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार, जानेवारी २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करायच्या आहेत. त्यामुळे आरक्षण जाहीर केले जात आहेत. दरम्यान, पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ नगरपंचायतीची प्रभागनिहाय आरक्षण सोडत (दि.०८) जाहीर करण्यात आली असून, यावेळी महिलांचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले आहे. एकूण १७ प्रभागांपैकी तब्बल ८ प्रभाग महिलांसाठी राखीव झाले आहेत.

लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठ्या टाकून पारदर्शक पद्धतीने ही सोडत काढण्यात आली. हा कार्यक्रम नगरपंचायत कार्यालयात सकाळी ११ वाजता संपन्न झाला. उपविभागीय अधिकारी महेश हरिश्चंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. प्रविण निकम यांच्या उपस्थितीत आरक्षण जाहीर करण्यात आले. या वेळी सर्व पक्षांचे पदाधिकारी, नागरिक आणि नगरपंचायतीचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला आरक्षणामुळे काही प्रभागांतील इच्छुक पुरुष उमेदवारांमध्ये निराशा दिसून आली, तर काही प्रभागांमध्ये नव्या चेहऱ्यांनी उत्साहाने तयारी सुरू केली आहे. सोडत जाहीर होताच सोशल मीडियावर भावी नगरसेवक या नावाने पोस्टांचा पाऊस पडू लागला असून, स्थानिक राजकारणात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार उद्या (९ ऑक्टोबर) प्रारूप आरक्षण रचना प्रसिद्ध होणार आहे. ९ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नागरिकांना हरकती आणि सूचना सादर करण्याची संधी दिली जाणार आहे.

# अनधिकृत फ्लेक्स, बॅनरप्रकरणी २७ जणांना दणका; गुन्हे दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात परवानगीशिवाय फ्लेक्स, बोर्ड किंवा बॅनर लावल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध महानगरपालिकेने कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसांत तब्बल २७ जणांवर थेट गुन्हे दाखल केले आहेत. तर ७१ जणांवर गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिसांना पत्र देण्यात आले आहे. याप्रकरणी लवकरच कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.



शहरात शहरात परवानगीशिवाय फ्लेक्स, बोर्ड किंवा बॅनर लावणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांना हे आदेश दिल्यानंतर स्वत: अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., उपायुक्त माधव जगताप आणि पाचही झोनल उपायुक्त गेल्या दोन दिवसांपासून कारवाईसाठी रस्त्यावर उतरले आहेत. मागील चार ते पाच दिवसांत शहरातील पाच हजारांहून अधिक बेकायदा बोर्ड, बॅनर्स हटविण्यात आले आहेत. तर ७१ प्रकरणांत पोलिसांना गुन्हे दाखल करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे.

यापैकी २७ प्रकरणांत पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत, अशी माहिती पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली. शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत फ्लेक्स बॅनर व अनधिकृत जाहिरातींमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो तसेच अपघातांची शक्यता वाढते तसेच

शहराचे विद्रूपीकरण होते. त्यामुळे महापालिकेने अनधिकृत फ्लेक्स, बोर्ड आणि बॅनरवर कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.